नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०७/२०२५ (गुरूवार)

---

## अंमली पदार्थाच्या अवैध धंदयात सक्रीय असणारा सराईत गुन्हेगार अभिनेष उर्फ अभिषेक देवशंकर वर्मा याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत राहणारा सराईत आरोपी **नामे अभिनेष उर्फ अभिषेक देवशंकर वर्मा, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला** हा पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील गुंड असुन परीसरात गुंडगिरी करतो. त्यांचे विरूध्द अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. तसेच तो गांजा विक्रीचे अवैध व्यवसायात सक्रीय आहे .त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचे विरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद करून त्याला अटक केले आहे. आरोपी **नामे अभिनेष उर्फ अभिषेक देवशंकर वर्मा, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला** याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी **अभिनेष उर्फ अभिषेक देवशंकर वर्मा, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलीसांकडुन एम.पी.डी.ए. कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक १८/०७/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपुर यांनी सराईत गुन्हेगार **नामे अभिनेष उर्फ अभिषेक देवशंकर वर्मा, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्रं १, येरला याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असुन तेव्हा पासुन नमुद आरोपी हा मिळुन येत नव्हता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफिने नमुद आरोपीचा शोध घेवुन त्यास दिनांक**

२३/०७/२०२५ रोजी आदेश तामील करून त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी दुसऱ्यांदा गांजा विक्रीचे अवैध व्यवसायात सक्रीय असणाऱ्या सराईत आरोपीवर एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत कारवाई केली आहे. यापुर्वी महाराष्ट्र राज्यात पहील्यांदाच गांजा विक्रीचे अवैध व्यवसायात सक्रीय असणारा सराईत आरोपी नामे आनंद उर्फ गोलु देवशंकर वर्मा, वय ३० वर्षे, रा. वार्ड क्रं १, येरला याचेवर नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत  कारावाई करून त्याला स्थानबध्द केले आहे.



आरोपी अभिनेष उर्फ अभिषेक देवशंकर वर्मा

## चोरीचे २ गुन्हे उघड, १२ आरोपी अटक

## एमआयडीसी बोरी पोलीसांची कामगिरी

**अपराध क्रमांक ३०८/२०२५ :—** पोलीस स्टेशन, एमआयडीसी बुटीबोरी हददीत औद्योगित क्षेत्रातील ॲपकॉन कंपनी, एमआयडीसी बुटीबोरी कंपनीच्या मोकळया आवारात टर्नल बोरींग मशिन चे ईलेक्ट्रीक केबल वायर १३१९ मिटर किंमती २,००,०००/— रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे अश्या फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून गुन्हा नोंद आहे.

एमआयडीसी बोरी पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करत गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून दिनांक १३/०७/२०२५ रोजी सदर गुन्हा उघडकीस आणुन साखळी पुरावे जोडुन सदर गुन्हयात १.निरज मुलचंद आत्राम, रा. अर्जुन नगर, काटोल, जि. नागपूर ह मु. छोटी बोरी, ता. जि. नागपूर. २. प्रकाश सुभाष माहापात्रा ,रा. छोटीबोरी, रूईखैरी ता. जि. नागपूर. ३. निहाल आंनदराव इरपाते, रा. वार्ड क्र. ४, चंद्रपुर रोड, रूईखैरी, ता. जि. नागपूर. ४. रोहित चैतराम मरसकोल्हे, रा. झोपडी कवडापूर, खुर्सापार, पोस्टे बेला, ता उमरेड, जि. नागपूर. ५. प्रविण अरूण लांजेवार, रा. बुटटीबोरी, ता. जि. नागपूर, ६. प्रफुल दामूजी काकडे, रा. मरेखात, त. समुद्रपूर, जि. वर्धा. यांना ताब्यात घेवुन त्यांना गुन्हया संदर्भात विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीतांच्या ताब्यातुन चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करून सदर गुन्हयात नमुद आरोपीतांना अटक केली आहे.

**अपराध क्रमांक ३१०/२०२५ :—** पोलीस स्टेशन, एमआयडीसी बुटीबोरी हददीत औद्योगित क्षेत्रातील सिएट टायर कंपनी, एमआयडीसी बुटीबोरी मध्ये दि. ०५/०७/२०२५ ते दि. १८/०७/२०२५ चे दरम्यान आवारातील खुल्या टिन शेड सिएट कपंनीचे दुचाकी टायर एकुण २५ नग किंमत ५०,००० रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे अश्या फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून गुन्हा नोंद आहे.

एमआयडीसी बोरी पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास पोलीस करीत गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून सदर दिनांक २१/०७/२०२५ रोजी सदर गुन्हा उघडकीस आणुन नमुद गुन्हयात १.शुभम ईश्वरी कटरे रा.कटोरी त.खैरलांजी जि.बालाघाट, राज्य मध्यप्रदेश ह.मु. धरमनगर, कळमना, नागपूर. २. भानुप्रसाद गिरधारी गौतम, रा. कटोरी, त. खैरलांजी, जि. बालाघाट, राज्य मध्यप्रदेश ह.मु. खापरी वर्धा रोड नागपूर. ३. शैलेश चुन्नीलाल रहागडाले रा.

कटोरी त. खैरलांजी जि. बालाघाट मप्र. हमु. कावळे यांचे घरी किरायाने दिघोरी नागपूर. ४. अंकीत कोमलचंद्र रहागडाले रा. कटोरी त. खैरलांजी जि. बालाघाट मप्र. हमु. सचिन यांचे घरी खबरी नागपूर. ५. मोहम्मद जब्बार मोहम्मद बली, रा. बिलनपूर, जि. वैशाली, बिहार हमु. कान्होली बारा, ता. हिगणा, जि. नागपूर ६. अर्नव अरूणकुमार कावळे, रा. सिरोहा बस स्टॉप जवळ, तुमसर, जि. भंडारा हमु. तिरंगा चौक नागपूर यांना ताब्यात घेवुन त्यांना गुन्हया संदर्भात विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. सदर गुन्हयात नमुद आरोपीतांना अटक करून आरोपीतांच्या ताब्यातुन चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला आहे. सर्व आरोपीतांना मा न्यायालयाने न्यायालयीन कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशीदारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील  संघटीत गुन्हेगारी च्या कलमान्वये कारवाई ,मौदा पोलसांची कामगिरी

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २३/०७/२०२५** रोजी अवैधरित्या विनापरवाना देशीदारू बाळगुन विक्री करणाऱ्या आणि दारू पुरवाठा करणारे आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदा अंतर्गत विशेष मोहीम राबवुन मौदा पोलीसांनी कारवाई करून आरोपीतांवर गुन्हे नोंद करून ७४८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपी नामे १) राजकमार काशिनाथ सहारे वय ५० रा. फुटाना ता. देवरी जि. गोंदीया, २) अमरजितसिंग ज्योतसिंग वय ४६ रा खालसा धाबा गुमथाळा शिवार ता. कामठी ३) गोपीचंद सहादेव ठवकर वय ५६ रा. चिरव्हा ता. कामठी, ४) धनराज दुधराम कनपटे वय ३७ रा.  चिरव्हा ता. कामठी ५) प्रकाश महादेव ढोक वय ४० रा. हणुमान मंदीर जवळ भुगाव, ६) चेतन सार्वे रा. कुही ता. कुही ७) भाउराव फागो कुंभले वय ५४ रा. भुगाव ता. कामठी, ९) योगेश पुरूषोत्तम वाढीवे वय २९ रा वडोदा ता. कामठी आणि दोन महीला आरोपी अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ७ गुन्हे दाखल करून देशी दारू एकुण ७४८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**या मध्ये अवैधरित्या देशीदारू विक्री करणारे आरोपी आणि त्यांना माल पुरवणारे आरोपी हे संघटीतपणे गुन्हा करीत असल्याने सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२**

**(किरकोळ संघटीत गुन्हेगारी) हे कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या कडे सादर केला आहे.**

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २३/०७/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना नगरधन शिवार ,रामटेक येथे अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे इसमाबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. रामटेक पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकली असता अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा आरोपी नामे अमोल मारोती लिल्हारे, वय २८ वर्ष, रा. चिचाळा, ता. रामटेक हा मिळुन आला. पोलीसांनी आरोपीचे ताब्यातुन २५० लिटर मोहाफुल सडवा किंमती १२,५००/—रूपये, रबरी टयुब मध्ये मोहाफुल गावठी हातभटटी दारू ६० लीटर एकुण किंमत ६,०००/—रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण २१,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. नमुद आरोपी विरुध्द पोस्टे रामटेक येथे ६५(बी), ६५(सी), ६५(ई), ६५(एफ) म.दा.का महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वेलतुर मर्ग क्रं १२/२०२५

**पोलीस स्टेशन वेलतुर :—** पोलीस स्टेशन वेलतुर येथे मर्ग क्र १२/२०२५ नोंद असुन यातील मृतक कांताबाई नारायन खोब्रागडे, वय ५० वर्ष, रा.वार्ड क्र ०४, वेलतुर, ता. कुही, जिल्हा नागपुर या मौजा चिखली शिवारातील आपल्या शेतात काम करीत असतांना दिनांक २३/०७/२०२५ रोजी चे १६/०० वा. वा दरम्यान त्यांच्या अंगावर विज पडल्याने त्या जखमी होवुन मरण पावल्या. सदर प्रकरणी या वेलतुर पोलीस स्टेशन येथे मर्ग नोंद करण्यात आला आहे.

# रामटेक मर्ग क्रं ६३/२०२५

**पोलीस स्टेशन रामटेक :–** पोलीस स्टेशन रामटेक येथे मर्ग क्र ६३/२०२५ नोंद असुन यातील मृतक सुजल लिखेश पटले, वय १७ वर्ष, रा.मानेगाव कटेरी, त. खैरलांजी, जि. बालाघाट, राज्य मध्यप्रदेश हा अंबाळा तलाव रामटेक येथे दुपारी २३/०७/२५ चे ११/३० वा सुमारास आपल्या आजीच्या अस्ती विसर्जनाच्या कार्यक्रमाकरिता आला असता अंबाळा तलावात आंघोळ करण्याकरिता गेला असता अचानक पाय घसरल्याने तो तलावाच्या पाण्यात पडला. त्याला पोहता येत नसल्याने पाण्यात बुडुन मरण पावला आहे. सदर प्रकरणी या रामटेक पोलीस स्टेशन येथे मर्ग नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**